| MHAM150008542026 | **दिवाणी किरकोळ अर्ज/२५२/२०२६**<br><br>**विनोद नामदेवराव सदांशिव व इतर वि.. कोणीही नाही** |
| --- | --- |

## निशाणी क्र.१ खालील आदेश

**०१.** अर्जदारांचे नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार यांनी अर्जामध्ये मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव यांचा मृत्यू दिनांक **१६/०२/२०२६** रोजी झाला आहे. मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव या अर्जदार क्र.१ व २ यांच्या आई असुन अर्जदार क्र.३-अ यांच्या आजी आहे. मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव यांचे पती नामदेव बबनराव सदांशिव हे दिनांक २५/११/२००५ रोजी मयत झाले आहे. मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव व नामदेव बबनराव सदांशिव यांना अर्जदार क्र.१ व २ तसेच अर्जदार क्र.३-अ यांचे वडील अर्जदार क्र.३ मयत प्रमोद नामदेवराव सदांशिव अशी एकुण तीन अपत्ये होती. अर्जदार क्र.३-अ यांचे वडील अर्जदार क्र.३ प्रमोद नामदेवराव सदांशिव व आई पुष्पा प्रमोद सदांशिव हे अनुक्रमे दिनांक २२/०५/२०१८ व २७/०९/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे नमुद केले आहे. अर्जदारांनी पुढे असे कथन केले की, अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही.

**०३.** अर्जदारांनी असे कथन केले की, ते मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**०४.** अर्जदारांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र.३-अ यांनी साक्षीपुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.१०) वर अभिलेखावर दाखल केले असुन त्यांनी सदर शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउल्लेख केला आहे. तसेच अर्जदारांनी त्यांच्या आधारकार्डांच्या प्रती (नि.क्र.१४ ते १६), मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव, प्रमोद नामदेव सदांशिव व नामदेव बबनराव सदांशिव यांचे मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती (नि.क्र.११ ते १३) वर दाखल केले आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र

"वृत्त आपली मातृभूमी" मध्ये दि. ४ एप्रिल २०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन (नि.क्र.१७) प्रसिध्द करण्यात आले, मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांनी त्यांचे पुरावा बंदपुरशिस (नि.क्र.१८) अभिलेखावर दाखल केले आहे. अर्जदार यांनी शपथेवर मयतांना अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नसल्याचे नमुद केले आहे. अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्याची मागणी केली आहे, अर्जदार यांनी अर्जातील कथनांचा पुनर्उल्लेख केल्याप्रमाणे अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी अन्य कुणीही आक्षेप घेतला नाही.

**०५.** वरील पुरावा व कागदपत्रांच्या आधारे सर्व अर्जदार हे मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव यांचे मृत्यु पश्चात त्यांचे वारसदार आहेत असे दिसते. त्यांच्या पुराव्याची विश्वासार्हता बाधित होईल याचे कोणतेही कारण समोर आलेले नाही. अशा परिस्थितीत, अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे ते मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव यांचे वारस असल्याचे दिसुन येत असल्याने ते वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असुन त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचीत होईल, म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करतो.

## आदेश

i. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.
ii. अर्जदार हे मयत रत्नाबाई नामदेवराव सदांशिव यांचे वारस असल्याबाबत त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक / शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.
iii. अर्जदारांनी अर्जाचा खर्च सोसावा.
iv. अर्ज निकाली काढण्यात येतो.

GANESH DATTA GURNULE
Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.07.14 15:19:40 +0530

**( जी. डी. गुरनूले )**
दिनांकः १४/०७/२०२६.
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
मोर्शी.

CERTIFICATE:-

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order/Judgment/Evidence .

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Pratiksha G. Uike |
| Court Name | :- | Shri. G.D.Gurnule,<br>Civil Judge (J.D.) and J.M.F.C.,<br>Morshi. |
| Date of decision | :- | 14.07.2026 |
| Judgment signed by PO. on | :- | 14.07.2026 |
| Judgment uploaded on | :- | 14.07.2026 |